# सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

मुख्य कार्यालय - पद्मभुषण वसंतदादा पाटील मार्ग, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली (महाराष्ट्र) ४१६४१६
फोन नं. EPABX - ०२३३ : २३२४६४१ ते २३२४६४५ Fax :०२३३-२३२२१०७
Website : www.sanglidccbank.com Email : sanglidcc@gmail.com

## जाहिर (निविदा) नोटीस.

मी खाली सही करणार **श्री. आर.टी.नाटेकर** प्राधिकृत अधिकारी, मला **"सिक्युरिटायझेशन ऍण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२"** चे कलम १३ (२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम क्र. ६,७,८ व ९ मधील तरतूदीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तमाम लोकांना कळविण्यात येते की, बँकेच्या उमदी शाखेकडील थकबाकीदार मे.सिध्दनाथ कृषी सेवा केंद्र ,उमदी प्रोप्रा.श्री.रोहित बाळासो शिंदे. यांचेकडून येणे असलेल्या कर्जखात्याच्या वसुलीपोटी बँकेने ताब्यात घेतलेल्या खालील स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी निविदा मागविणेत येत असून, इच्छुकांनी सिलबंद पाकीटातून निविदा अर्ज बयाणा रक्कमेचा सांगली वरील डी.डी. व KYC पूर्ततेसह प्राधिकृत अधिकारी यांचेकडे पाठवावेत व सदर सिलबंद **पाकीटावर "दि.१२/०६/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता उघडणेसाठीचा उमदी येथील मिळकतीचा निविदा अर्ज"** असा उल्लेख करावा. सदर निविदा बँकेच्या शाखा मा.या.जत वा बँकेच्या मुख्य कचेरी येथे खाली नमूद केलेल्या तारखेस व वेळेस उघडण्यात येतील.

१) मिळकतीचा संक्षिप्त तपशिल -

| अ.नं. | तपशिल | एकूण क्षेत्र. |
|---|---|---|
| अ) | मु.पो.उमदी ता.जत येथील १)ग्रामपंचायत मिळकत मधील बीगरशेती प्लॉट, सि.स.नं.- ९७९ क्षेत्र ६०.६० चौ.मी<br>२) ग्रामपंचायत मिळकत मधील बीगरशेती प्लॉट,सि.स.नं.- ९८१ क्षेत्र ५३.४० चौ.मी.<br>३)ग्रामपंचायत मिळकत मधील बीगरशेती प्लॉट, सि.स.नं.- ९८२ क्षेत्र ४४.७० चौ.मी | १५८.७० चौ.मी |

| अ.नं. | मालमत्ता धारक | राखीव किंमत | बयाणा रक्कम | निविदा फार्म स्विकारणेची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडणेची वार, तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| अ) | श्री.बाळासाहेब विष्णु शिंदे,श्री.बाबासाहेब विष्णु शिंदे,श्रीमती.येसुबाई विष्णु शिंदे रा. उमदी ता. जत जि.सांगली | रु. १३,२७,०००/- | रु.१,३२,७००/- | दि. ०९/०६/२०२३ दुपारी २.०० पर्यंत | सोमवार दि. १२ /०६/२०२३ दुपारी २.०० वाजता, शाखा- मा.या.जत/हे.ऑ.सांगली |

**अटी / शर्ती -**

१) वरीलप्रमाणे मालमत्तेची "जशी आहे, जेथे आहे तशी आणि कोणतीही हमी, जिम्मेदारी, उत्तरादायित्व व जोखीम न स्विकारता" (AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, AND WHATEVER THERE IS, BASIS, WHICH IS, WITHOUT ANY WARRANTY, GUARANTEE, ASSURANCE, UNDERTAKING OR REPRESENTATION OF ANY KIND WHATSOVER) या तत्वावर विक्री करणेसाठी सीलबंद निविदा मागविणेत येत आहेत. मालमत्तेवरील अज्ञात बोजे प्राधिकृत अधिकारी यांना ज्ञात नाहीत. सदर अज्ञात बोजेबाबत तसेच इतर कायदेशीर देणे बाबतची जबाबदारी प्राधिकृत अधिकारी यांची नसून, सदरची अनुषंगीक देणी देणे संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील. २) निविदा उघडणेपुर्वी प्राधिकृत अधिकारी यांचेकडे पोहोच झालेल्या निविदा अर्जाचा विचार केला जाईल. ३)निविदा अर्जासोबत बयाणा रक्कमेचा सांगली येथील राष्ट्रीयकृत बँक / शेड्युल बँकेवरील डी.डी. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., यांचे नांवे देणेत यावा. बयाणा रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. ४) जास्तीत जास्त बोली मंजूर होणा-याने बोलीची २५ % रक्कम निविदा उघडणेच्या दिवशी डी.डी. ने बँकेकडे जमा करावी लागेल. ५) उर्वरित ७५ % रक्कम व खरेदीपत्रासाठी होणारी स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, इतर खर्च अशी सर्व रक्कम निविदा उघडणेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आंत बँकेकडे जमा करावी लागेल अन्यथा भरलेली सर्व रक्कम जप्त करणेत येईल व घेतलेल्या मालमत्तेवर बोलीदाराचा अधिकार राहणार नाही. निविदा अर्जदारांनी बँकेकडे भरलेल्या रक्कमेवर व्याज देणेचे बंधन बँकेवर अगर प्राधिकृत अधिकारी यांचेवर राहणार नाही. ६) विक्रीचे संदर्भात निविदा उघडलेनंतर निर्माण होणारी कोणत्याही प्रकारची आर्थिक व कायदेशीर जबाबदारी खरेदीदारावर राहील. ७) एका व्यक्तिस एकापेक्षा अधिक निविदा भरणेचा अधिकार राहील. प्रत्येक निविदेसाठी विहित केलेली बयाणा रक्कम स्वतंत्ररित्या बँकेकडे विहित वेळेत भरावी लागेल. ८) समान रक्कमांच्या निविदांबाबत प्राधिकृत अधिका-यांचा निर्णय अंतिम राहील. ९) इच्छुकास मिळकत बँकेच्या पुर्वपरवानगीने बँकेच्या कार्यालयीन वेळेत दि. १२ /०५/२०२३ ते ०९/०६/२०२३ या कालावधीमध्ये सुट्टीखेरीज सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल. १०) दि. १२/०५/२०२३ ते दि. ०९/०६/२०२३ या कालावधीमध्ये सुट्टीखेरीज सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत रोखीने रक्कम रु. ५०००/- (अक्षरी रुपये पांच हजार) + जीएसटी मात्रचे शुल्क , शाखा मा. या जत. येथे भरुन कोरा निविदा फॉर्म खालील निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे उपलब्ध होईल. सदर रक्कम रु. ५०००/- मात्र परत दिली जाणार नाही. ११) निविदा विक्री कायम करणेचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. १२) टेंडर उघडणे तारखेपुर्वी अगर विक्रीची १०० % रक्कम खरेदीदाराने भरणेपुर्वी कर्ज खाते बेबाक झाल्यास सदर निविदा प्रक्रिया रद्द समजणेत येईल व महत्तम निविदाधारकाने भरलेली रक्कम त्यास परत देणेत येईल. मात्र सदर रक्कमेवर व्याज देणेची जबाबदारी प्राधिकृत अधिकारी अगर बँकेची राहणार नाही. १३) विक्री प्रक्रियेतील महत्तम बोलीची रक्कम ही प्राधिकृत अधिकारी यांचे अपेक्षेप्रमाणे / समाधानकारक नसल्यास विक्री प्रक्रिया रद्द / तहकूब करणेचा तसेच कोणतेही कारण न देता, निविदा स्विकारणे अथवा निविदा नामंजूर करणेचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. १४) अटी व शर्ती मध्ये बदल करणेचा अगर त्या शिथील करणेचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

स्थळ - मा.या.जत
दि. १२/०५/२०२३

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली करीता
सही-

आर.टी.नाटेकर
(प्राधिकृत अधिकारी)